मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरात तूर्तास पाणी कपात नाही!

## महापालिकेचे पाणी कपातीचे नियोजन तयार : पवना धरण क्षेत्रात दमदार पाऊस, पाणी पातळीत वाढ

**पिंपरी | प्रतिनिधी**

संपूर्ण शहराची तहान भागविणा-या पवना धरण क्षेत्रात चांगला पाऊस होत आहे. १५ जूननंतर पावसाला सुरुवात झाली आहे. त्यामुळे धरणात पाण्याची पातळी वाढण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे तूर्तास तरी पिंपरी-चिंचवड शहराची पाणी कपात टळली आहे.

पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना, आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. संपूर्ण शहराची भिस्त पवना धरणावर आहे. शहरासह मावळ तालुक्यातील विविध गावांचा पाण्याचा मुख्य स्रोत पवना धरण आहे. महापालिका प्रशासनाने पाणीपुरवठ्याच्या तक्रारी वाढल्याने आणि समान पाणीपुरवठ्याचे कारण देत २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. साडेचार वर्ष झाले तरी नागरिकांना एक दिवसाआड पाणी पुरवठा सुरू आहे.



पवना धरण परिसरात १ जूनपासून २९४ मिलिमीटर पावसाची नोंद झाली असून, पाणीसाठा १९.०१ टक्के आहे. हा साठा २० जुलैपर्यंत पुरेल एवढाच आहे. गेल्या वर्षी जुलैच्या सुरुवातीला २०.१६ टक्के पाणीसाठा होता. तर, ४२३ मिलिमीटर पावसाची नोंद झाली होती. या वर्षी ३४६ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. सध्यस्थितीत शहराला दिवसाला ६१५ दशलक्ष लीटर पाणीपुरवठा करावा लागत आहे. महापालिका दिवसाला पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८० आणि औद्योगिक विकास महामंडळाकडून (एमआयडीसी) १५ असे ६१५ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी उचलून पुरवठा करत आहे. दरम्यान, हवामान विभागाच्या अंदाजानुसार यंदा चांगला पाऊस होईल. जुलै महिन्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस पडण्याचा अंदाज आहे. जुलै महिन्यात पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे जर पाऊस चांगला झाला तर शहरावर असलेले पाणी कपातीचे संकट निश्चित टळणार आहे.

### ..तर नियोजन करायला हवे

जुलै महिन्यात पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पावसाचे प्रमाण कमी राहिल्यास उपलब्ध पाण्याचे नियोजन करायला हवे. त्यानुसार महापालिका पाणीपुरवठा विभागाकडून पाणी कपातीचे नियोजन केले आहे. त्यानुसार धरणात २०.१५ इतका पाणीसाठा आहे. जुलैमध्ये पावसाने उघडीप दिल्यास पाण्याचे योग्य नियोजन करावे लागणार आहे. त्यामुळे पाणी कपातीचे नियोजन केले असून त्यासाठी आयुक्तांशी चर्चा करून निर्णय घेतला जाणार असल्याचे पाणीपुरवठा अधिका-यांनी सांगितले.

### लोकसंख्येमुळे तक्रारीत वाढ

» पिंपरी-चिंचवडला पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मागील साडेचार वर्षांपासून एकदिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. शहरातील लोकसंख्या आणि भविष्यातील २०४५ पर्यंतची लोकसंख्या विचारात घेऊन पालिका आंद्रा, भामा आसखेड धरणातून २६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी आणणार आहे. त्या पाण्यावरील प्रक्रियेसाठी चिखलीत जलशुद्धीकरण केंद्र उभारण्यात आले आहे. आंद्रा धरणातून निघोजे येथील बंधाऱ्यातून पाणी उचलून समाविष्ट भागातील नागरिकांना देण्यात येत आहे. परंतु, वाढत्या लोकसंख्येला पाणी कमी पडत असून, तक्रारींमध्ये वाढ होत असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

> पवना धरणात सध्या पुरेसा पाणीसाठा आहे. सध्याच्या उपलब्ध पाणीसाठ्यानुसार जुलै महिन्यात पाणी कमतरता भासणार नाही. जुलैमध्ये पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तूर्तास पाणी कपातीची आवश्यकता नाही. जुलै महिन्यातील पावसाचा अंदाज घेऊन परिस्थितीनुसार पाणी कपातीबाबतचा निर्णय घेण्यात येईल.
>
> - शेखर सिंह, आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका.

# आयुक्तांनी नामफलकावर केला आईच्या नावाचा समावेश

## महिलांप्रती सन्मानाची भावना निर्माण होण्यासाठी शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी सुरु : प्रशासकीय दस्तऐवजांवर मराठी स्वाक्षरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शासकीय दस्तऐवजांवर उमेदवाराच्या नावापुढे आईचे नाव लिहिणे, सर्व प्रशासकीय कामकाज मराठी भाषेतून करणे या दोन्ही शासन निर्णयांची अंमलबजावणी करण्यास पिंपरी-चिंचवड महापालिकेने सुरुवात केली आहे. त्यानुसार आयुक्त शेखर सिंह यांच्या नामफलकासह इतर अधिकाऱ्यांच्या नामफलकामध्ये आईच्या नावाचा समावेश करण्यात आला. आयुक्त दालनाबाहेर आयुक्तांचा नामफलक सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. तसेच महापालिकेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी प्रशासकीय दस्तऐवजांवर मराठी भाषेत स्वाक्षरी करण्यासही सुरुवात केली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेला कामकाज, व्यवहारामध्ये मराठी भाषेचा वापर करण्याबाबत तसेच उमेदवाराच्या नावापुढे आईच्या नावाचा समावेश करण्याबाबत सरकारच्या मराठी भाषा विभागाने परिपत्रकाद्वारे कळवले आहे. या निर्णयांची अंमलबजावणी करत आयुक्त शेखर सिंह यांच्या आयुक्त दालनाबाहेरील नामफलकामध्ये बदल करून 'शेखर अनिता चंद्रहास सिंह' असा नामफलक लावण्यात आला आहे. तसेच इतर अधिकाऱ्यांच्याही नावापुढे आईच्या नावाचा समावेश करून त्यांच्या दालनाबाहेरील नामफलक बदलण्यात येत आहेत.



महिलांना पुरुषांबरोबर समानतेची वागणूक देण्यासाठी, समाजामध्ये महिलांप्रती सन्मानाची भावना निर्माण करण्यासाठी तसेच एकल पालक महिलांची संतती (अनौरस संतती) यांनाही समाजामध्ये ताठ मानाने जगता यावे यासाठी शासकीय दस्तऐवजांवर उमेदवाराचे नाव, आईचे नाव नंतर वडिलांचे नाव व आडनाव अशा स्वरूपात नाव नोंदविणे बंधनकारक करण्याबाबतच्या धोरणात्मक निर्णयास राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाने मान्यता दिली आहे. या शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश राज्य शासनाने महापालिकेला दिले आहेत.

# शहरातील 165 जागा महिलांसाठी 'हॉटस्पॉट'!

## धोकादायक, असुरक्षित ठिकाणी सुरक्षा वाढवण्याचे : प्रतिबंधात्मक उपाय योजण्याचे पोलिसांचे आदेश

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील थोडीथोडकी नव्हे तर तब्बल १६५ ठिकाणे महिलांसाठी असुरक्षित असल्याची माहिती समोर आली आहे. पुणे पोलिसांनी महिला सुरक्षेच्या अनुषंगाने संवेदनशील असलेले हे 'हॉटस्पॉट' शोधून काढले आहेत. यामध्ये सर्वाधिक संवेदनशील 'हॉटस्पॉट' हे अनुक्रमे शिवाजीनगर, पर्वती, बिबवेवाडी, हडपसर आणि येरवडा पोलीस ठाण्यांच्या हद्दीत आहेत. यासोबतच शहरातील पाचही परिमंडळांमध्ये सर्वाधिक 'हॉटस्पॉट' अनुक्रमे परिमंडळ चार, पाच आणि एकच्या हद्दीत आढळून आले आहेत. शासनाच्या निर्णयानुसार पुण्यामध्ये २०१५ साली पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या 'महिला सुरक्षा समिती'च्या वतीने या ठिकाणी उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. त्या अनुषंगाने कारवाई सुरू केली आहे.



राज्य शासनाने महिलांच्या सुरक्षा संदर्भात आवश्यक उपाययोजना करण्यासाठी सर्व पोलीस दलांना २०१५ साली महिला सुरक्षा समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. शासनाच्या आदेशानुसार तत्कालीन पोलीस आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली २०१५ साली 'महिला सुरक्षा समिती' स्थापन करण्यात आली होती. त्यानंतर काही काळ ही समिती 'डी ॲक्टिव्हेट' असल्याचे समोर आले होते. महिला आणि मुलींच्या दृष्टीने संवेदनशील असलेल्या ठिकाणांची यादी तयार करून या ठिकाणांवर आवश्यक त्या उपाययोजना करण्याची महत्त्वाची जबाबदारी समितीवर असते. ही समिती स्थापन झाल्यानंतर पोलीस आयुक्तालयामध्ये या संदर्भात दर महिन्याला बैठकादेखील होत होत्या. परंतु, त्यामध्ये काही काळ खंड पडलेला होता. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पुण्याचा पदभार स्वीकारल्यानंतर या समितीच्या कामाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले आहे. या समितीच्या कामाला प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली असून पोलीस आयुक्तांकडून या विषयी बैठका घेऊन आवश्यक सूचना केल्या जात आहेत.

या समितीमध्ये पोलीस अधिकाऱ्यांसोबतच पुणे महापालिकेचे अधिकारी, महावितरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आदी नागरी सेवा सुविधा पुरवणाऱ्या खात्यातील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शहरात महिला मार्शल नेमले आहेत. पोलिसांचे दामिनी पथकही पोलीस ठाणे स्तरावर काम करीत आहे. गुन्हे शाखेच्या भरोसा सेल मार्फतही दामिनी काम करीत आहेत. शासनाच्या आदेशानुसार स्थापन झालेल्या या समितीमार्फत शहरातील भुयारी मार्ग, उड्डाणपूल, निर्जन स्थळे, बागा, महाविद्यालयांचे परिसर, शाळांचे परिसर, कामाची ठिकाणे, बस व रेल्वे स्थानके, मेट्रो स्थानके, जीम आदी ठिकाणी असणाऱ्या सुरक्षेची नियमित पाहणी आणि त्यावर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते.

या ठिकाणी रात्रीच्या वेळी आवश्यक विजेची उपलब्धता, सुरक्षारक्षक आहेत की नाही, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत की नाही, निर्जन स्थळांवर, गर्दीच्या ठिकाणी पोलिसांची गस्त असते का? महिलांना सुरक्षित वाटते का, हे पाहून त्यावर कार्यवाही करण्याचे आदेश वेळोवेळी संबंधित विभागांना देण्यात येतात. शहरातील कोणत्या जागा महिलांसाठी सुरक्षित नाहीत, त्यांचीही पाहणी या उपक्रमाअंतर्गत करून योग्य त्या उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या जातात. या समितीमध्ये सर्व विभागांचे अधिकारी असल्याने आपापल्या यंत्रणांशी समन्वय साधून आवश्यक उपाययोजना लवकरात लवकर केल्या जाव्यात असा त्यामागील हेतू आहे. ज्या रस्त्यांवर कमी प्रकाश आहे, तेथील प्रकाश व्यवस्था वाढवणे, पदपथ सुरक्षित करून घेणे, भुयारी मार्गांमध्ये पुरेशी प्रकाश व्यवस्था करणे, सार्वजनिक स्वच्छतागृहांमध्ये दारे, खिडक्या व्यवस्थित करून घेणे तसेच तेथेही प्रकाशव्यवस्था निर्माण करणे अशी कामे पालिका, महावितरण आणि पीडब्ल्यूडीच्या माध्यमातून एकत्रितपणे केली जाणे अपेक्षित आहे.

> माझ्या अध्यक्षतेखाली असलेल्या महिला सुरक्षा समितीच्या नियमित बैठका घेतल्या जातात. महिला सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना केल्या जात आहेत. प्रत्येक पोलीस ठाण्याकडून त्यांच्या हद्दीतील संवेदनशील ठिकाणांची यादी करण्यात आलेली आहे. या ठिकाणांवर महिला पोलीस मार्शल आणि दामिनी पथकाकडून सातत्याने गस्त घालण्यात येते. महिला सुरक्षेबाबत पोलीस गंभीर असून योग्य त्या उपाययोजना सुरू आहेत. नदीकिनारे, शाळा, महाविद्यालये, निर्जन ठिकाणीही गस्त घातली जात आहे. अनेकदा स्थानिक पोलिसांच्या मदतीने रोडरोमियो आणि मवाल्यांवर कारवाई केली जात आहे.
>
> **- अमितेश कुमार, पोलीस आयुक्त.**

# कंत्राटी कामगारांचा पालिका उतरवणार अपघाती विमा

## आठ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांना होणार फायदा : 265 रुपयांत मिळणार 15 लाखांचे सुरक्षा कवच

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेत काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांसाठी आनंदाची बातमी आहे. महापालिकेत काम करणाऱ्या जवळपास आठ हजाराहून अधिक कर्मचाऱ्यांचा सुमारे १५ लाख रुपयांचा अपघाती विमा उतरवला जाणार आहे. त्यासाठी कर्मचाऱ्यांकडून अवघे २६५ रुपये घेतले जाणार आहेत. ही माहिती महापालिकेचे मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांनी दिली.



पालिका कायम कर्मचाऱ्यांसाठी समूह अपघात विमा योजना चालवली जाते. पूर्वी कर्मचाऱ्यांकडून १३६ रुपये घेऊन १० लाखाचा विमा उतरवला जायचा. मात्र, मागील वर्षीपासून रक्कम वाढवली आहे. वर्ग एक साठी २५ लाख, वर्ग दोनसाठी २० लाख, वर्ग तीन व चारसाठी १५ लाखांचा विमा उतरवला जात आहे. मात्र, ही योजना कंत्राटी कामगारांसाठी नव्हती. याबाबत मुख्य कामगार अधिकारी नितीन केंजळे यांच्या नियोजनाखाली पालिकेने कंत्राटी कामगारांसाठीही ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत नितीन केंजळे यांनी सांगितले की, कंत्राटी कामगारांचा विमा उतरवण्यासाठी कंपनीने तयारी दाखवली. त्यानुसार महापालिकेतील ठेकेदारही यासाठी तयार झाले आहेत. त्यानुसार विमा उतरवण्यास सुरुवात झाली आहे. ठेकेदारांच्या मार्फत विमा उतरवण्यात येत आहे.

पालिकेत जवळपास ८ हजाराहून अधिक कंत्राटी कमर्चारी आहेत. हे सगळे वर्ग चार मधील कर्मचारी आहेत. या लोकांना जोखमीची कामे करावी लागतात. यात काही कर्मचाऱ्यांचा मृत्यूदेखील होतो. परिणामी या लोकांचे कुटुंब उघड्यावर पडते. असे होऊ नये यासाठी १५ लाखाचा विमा उतरवण्याचा निर्णय आम्ही घेतल्याचे केंजळे यांनी सांगितले. केंजळे यांनी पुढे सांगितले की, अपघाती मृत्यू झाल्यास किंवा अपंग झाल्यास त्या त्या प्रमाणात ही रक्कम मिळेल. त्यासाठी कर्मचाऱ्यांना फक्त २६५ रुपये ५० पैसे द्यावे लागणार आहेत. हे काम ठेकेदारामार्फतच केले जाणार आहे.

> कंत्राटी कर्मचाऱ्यांचा अपघाती विमा उतरवण्याबाबत ठेकेदारांना सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार ठेकेदारांनी या कामाला सुरुवात केली आहे. कामगारांना याचा चांगला लाभ होऊ शकतो. ठेकेदारांनी आणि कर्मचाऱ्यांनी याची गंभीरतेने दखल घेऊन याचा लाभ घ्यावा.
>
> **- नितीन केंजळे,मुख्य कामगार अधिकारी, पुणे महापालिका.**

# महामेट्रोचा खासदार, आमदारांना ठेंगा!

## निगडीतील पीएमपीएमएल बसस्थानका शेजारी पहिल्या खांबाच्या कॉंक्रीट कामाची पायाभरणी करण्यात आली

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रकल्प असलेल्या पिंपरी ते निगडी मेट्रोचे विस्तारीकरण होत आहे. पुणे महामेट्रोने शनिवारी (दि.७) निगडीतील पीएमपीएमएल बसस्थानका शेजारी पहिल्या खांबाच्या कॉंक्रीट कामाची पायाभरणी करण्यात आली. मात्र, या कार्यक्रमाला शहरातील शिरुर व मावळचे खासदार, शहरातील चार आमदार यांना महामेट्रोकडून डावलण्यात आले. तर महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर आणि महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी पायाभरणी करत प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याने विविध राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

शनिवारी (दि.७) दुपारी १२ वाजता पुणे मेट्रोच्या पीसीएमसी-निगडी मार्गावरील पहिल्या खांबाच्या पायाचे कॉंक्रीटच्या कामाला अण्णाभाऊ साठे पीएमपीएमल बस आगार, निगडीत सुरुवात करण्यात आली. सर्व आवश्यक भूगर्भ तपासण्यांनंतर महत्त्वपूर्ण कामाला सुरुवात केली आहे. या प्रसंगी महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंग, संचालक अतुल गाडगीळ, संचालक विनोद अग्रवाल, कार्यकारी संचालक प्रशासन आणि जनसंपर्क डॉ. हेमंत सोनवणे आणि इतर मेट्रो आणि पीसीएमसी व पीएमपीएमएलचे अधिकारी, कर्मचारी या कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

पिंपरी ते निगडी मेट्रोचे विस्तारीकरण हा मुद्दा आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीत प्रचाराच्या अग्रस्थानी राहणार आहे. त्यामुळे मेट्रोचे प्रत्येक कार्यक्रमात सत्ताधारी पक्षाच्या खासदार, आमदार, महापालिकेचे माजी नगरसेवक, विविध पक्षाचे पदाधिकारी यांना निमंत्रण दिले जाते. पण, पिंपरी ते निगडी मेट्रोचे विस्तारीकरण झाले पाहिजे म्हणून विविध सामाजिक संघटना, नागरिक रस्त्यावर उतरुन आंदोलन करत होते. राजकीय पक्षांकडूनही मेट्रोच्या विस्तारीकरणाच्या कामाला वेग द्यावा म्हणून सातत्याने मागणी केली जात होती. त्यानूसार पिंपरी ते निगडी विस्तारित मार्ग तयार करण्यात आला. त्यामुळे चिंचवड, आकुर्डी, निगडी व्यावसायिक, निवासी, औद्योगिक आणि धार्मिक स्थळे जोडण्यात येईल. देहू, चिखली, तळेगाव आणि वडगाव यांसारख्या निमशहरी भागातील नागरिकांना प्रवास करणे सोपे होणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात ऑटोमोबाईल आणि आयटी क्षेत्रात वेगाने औद्योगिक वाढ होत आहे. मोठ्या कंपन्यांना आकर्षित करत आहे. शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुनियोजित रस्त्यांचे जाळे, मुंबई-पुणे एक्स्प्रेस-वेद्वारे कनेक्टिव्हिटी आणि आगामी मेट्रो मार्गिका यांचा समावेश आहे. त्यामुळे पिंपरी ते निगडी हा भाग औद्योगिक आणि निवासी क्षेत्रांना जोडतो. त्यात उच्च शैक्षणिक संस्था, आरोग्य सुविधा, व्यावसायिक केंद्रे, शॉपिंग मॉल्स आणि सुनियोजित निवासी संकुले आहेत. निगडी बसस्थानक, मेट्रो मार्ग प्रवासाची कनेक्टिव्हिटी वाढवून वाहतूक केंद्र बनत आहे.

दरम्यान, आगामी विधानसभा, महापालिका निवडणुकीच्या दृष्टीने सत्ताधारी पक्षासाठी महामेट्रो प्रकल्पाच्या कामे सुरु होवून प्रकल्प वेळेत पुर्ण करणे महत्वाचा आहे. त्यामुळे महामेट्रोने निगडीत पहिल्या खांबाच्या पायाचे कॉंक्रीटच्या कामाला सुरुवात करत पायाभरणी केली. पण, आता कोणतीही आचारसंहिता नसतानाही राजकीय लोकप्रतिनिधी, माजी नगरसेवक, विविध पक्षाच्या पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्त्यांना या कार्यक्रमाची कोणतीची माहिती देण्यात आली नाही. प्रत्यक्षात महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हर्डीकर हे यापुर्वी महापालिकेचे आयुक्त होते. त्यांनी देखील दोन्ही खासदार, आमदार यांना निमंत्रण न देता स्वतःच कार्यक्रम उरकून घेतला. या कार्यक्रमास ऐनवेळी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निमंत्रित करण्यात आले. त्यानूसार महामेट्रो आणि महापालिका अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्षात पिंपरी ते निगडी मेट्रोच्या पिलर कामाला सुरुवात केली. त्यामुळे विविध पक्षाच्या कार्यकर्त्यांसह नागरिकांतून नाराजी व्यक्त होत आहे.



### 130 आठवड्यांत पूर्ण होणार

» पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या उत्तर-दक्षिण मार्गिकेवरील पिंपरी ते निगडी (भक्ती शक्ती चौक) या ४.५१९ किमी लांबीच्या उन्नत मार्गिकेच्या व्हायाडक्टचे काम १५ मार्च २०२४ रोजी रेल विकास निगम लिमिटेड या कंपनीला देण्यात आले. हा प्रकल्प १३० आठवड्यांत पूर्ण होणार आहे. त्यात चार स्थानके असतील. चिंचवड, आकुर्डी, निगडी आणि भक्ती-शक्ती. या मार्गाच्या व्हायडक्त बांधकामासाठी १५१ स्पॅन आणि ११८१ सेगमेंटची आवश्यकता लागणार आहे. RUNL ने तळेगाव जवळ सेगमेंट व गर्डर बनवण्याला सुरुवात केली आहे. हा विस्तार पुणे मेट्रो फेज - १ च्या मार्गिका- १ चा नैसर्गिक विस्तार आहे.

> पीसीएमसी ते निगडी या विस्तारित मार्गाच्या कामाची सुरुवात होत आहे. या मार्गामुळे रहिवासी भाग, कारखाने, शाळा, कॉलेज मेट्रोने जोडले जाणार आहेत. या मार्गाच्या कामासाठी पीसीएमसी तर्फे सर्वोतपरी मदत करण्यात येईल..
>
> \- शेखर सिंह, आयुक्त- पिंपरी चिंचवड महापालिका

> हा कार्यक्रम नव्हता तर पिंपरी ते निगडी मेट्रोच्या पहिल्या पिलरसाठी कॉंक्रीटच्या कामाला सुरुवात केलेली आहे. नियोजित १३० आठवड्यांच्या वेळेत हे काम पूर्ण करायचे आहे. याकरिता मेट्रोने नियोजन केले आहे. त्या अनुषंगाने वेगाने काम सुरु केले आहे.
>
> \- श्रावण हर्डीकर, व्यवस्थापकीय संचालक, महामेट्रो

# पिंपरी-चिंचवड महापालिकेवर ईडीची वक्रदृष्टी!

## आरोग्य विभागातील 220 कोटींच्या घोटाळ्याप्रकरणी पिंपरी-चिंचवड पालिकेविरुद्ध एफआयआर दाखल करण्याची सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागातील दैनंदिन रस्ते व गटर साफसफाईच्या आठ क्षेत्रीय कार्यालयाच्या २२० कोटींच्या निविदा प्रक्रियेत आर्थिक घोटाळा झाल्याचा आरोप रयत विद्यार्थी परिषदेने केला आहे. या प्रकरणाची रयतने सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) तक्रार केली होती. याबाबत सक्तवसुली संचालनालयाने तक्रारीची गंभीर दखल घेतली असून महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह ठेकेदार कंपन्यावर एफआयआर दाखल करण्याच्या सूचना रयत विद्यार्थी परिषदेला दिल्याने महापालिकेत खळबळ उडाली आहे.

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाने आठ क्षेत्रीय कार्यालयनिहाय दैनंदिन रस्ते व गटर साफसफाई कामाची निविदा काढली होती. सन २०२१ - २०२२ मध्ये निविदा नोटीस क्रमांक ३ (१ ते ८) एकूण २२० कोटी रुपयांची राबवली होती. या निविदा प्रक्रियेत नियम, अटी व शर्तीचे उल्लंघन करुन नियमबाह्य पध्दतीने अपात्र कंत्राटदाराना पात्र करत शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत ठेकेदार कंपन्यांना कंत्राट देण्यात आली. याबाबत रयत विद्यार्थी परिषदेने संचालक, सक्तवसूली संचालनालय, मुंबई यांच्याकडे २२ जून २०२२ रोजी महापालिकेच्या आरोग्य विभागातील संपूर्ण निविदा प्रक्रियेत अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर केला आहे, नियम व अटींचे उल्लंघन करून कंत्राट देण्यात आली आहेत, त्यात २२० कोटींचा घोटाळा झाला असून संबंधितावर जबाबदारी निश्चित करून दोषींवर गुन्हे दाखल करा, अशी मागणी केली होती.

याबाबत सक्तवसुली संचालनालयाकडे केलेल्या तक्रारीत रयत विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष सुर्यकांत सरवदे यांनी म्हटले आहे की, महापालिकेच्या आरोग्य विभागातील दैनंदिन रस्ते सफाईच्या एकूण २२० कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत आर्थिक घोटाळा केला आहे. या अगोदर सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) तक्रार केली होती. यात महापालिकेच्या तत्कालीन आयुक्तांचा या आर्थिक घोटाळ्यात थेट सहभाग असल्यामुळे महापालिका प्रशासनाकडे तक्रार दाखल केली नाही. एकूण २२० कोटींच्या दैनंदिन रस्ते गटर निविदा आर्थिक घोटाळ्याचे मास्टरमाइंड तत्कालीन आयुक्त, अतिरिक्त आयुक्त (एक) आणि उपायुक्त, आरोग्य अधिकारी आहेत. या सर्व निविदा प्रक्रियेतील अनागोंदी कारभार पाहता भ्रष्टाचाराची सर्व कागदपत्र सादर करण्यात आलेली आहेत.



### ठराविक ठेकेदारांना मिळाला आर्थिक लाभ

» रस्ते साफसफाई निविदेच्या नियम अटी व शर्तीचे उल्लंघन करून नियमबाह्य पद्धतीने अपात्र कंत्राटदारास पात्र करून कंत्राट दिले. ठराविक कंत्राटदारास आर्थिक लाभ मिळवून देण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक इतर कंत्राटदारास अपात्र केले. यामध्ये में. शुभम उद्योग, मे. तिरुपती इंडस्ट्रियल सर्व्हिसेस, मे. सिक्युअर आयटी मॅनेजमेंट या कंत्राटदारास एकापेक्षा जास्त कंत्राट देण्यात आले.

# आमदार भरणेंची हॅट्रिकची वाट अघवड!

## यंदा हॅट्रिक साध्यण्यासाठी स्वपक्षीयांबरोबरच मित्रपक्षांच्या उमेदवारांशी झुंज द्यावी लागणार आहे




**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन पक्षांत विभागी झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीत पुतण्यापेक्षा काका सरसर ठरले आहेत. त्यामुळे अजित पवार गटातील अनेक नाराज मंडळी ही काका म्हणजेच शरद पवारांच्या पक्षात जाण्यास इच्छुक आहेत; मात्र अजित पवारांचे कट्टर समर्थक म्हणून आमदार दत्तात्रय भरणे यांचे नाव आघाडीवर आहे..

याच भरणेंना यंदा हॅट्रिक साध्यण्यासाठी स्वपक्षीयांबरोबरच मित्रपक्षांच्या उमेदवारांशी झुंज द्यावी लागणार आहे. तर महायुती तुटली नाही तर आमदार भरणे की माजी आमदार हर्षवर्धन पाटलांना तिकीट मिळणार का तसेच शरद पवार गटाकडून कोणास उमेदवारी मिळणार का हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

मागील दोन दिवसांपूर्वी इंदापूर तालुक्यात प्रचंड घडामोडी झाल्या. यामध्ये आमदार दत्तात्रय भरणे यांच्या समर्थकांनी मनापासून जोर लावून नवे जुने कार्यकर्ते एकत्र करून,विधानसभेची तयारी सुरू करण्याचा श्रीगणेशा केला. भारतीय जनता पार्टी, शिवसेना, तसेच अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र असल्यामुळे आमदार भरणे यांना अनोखे बळ राज्य सरकारकडून मिळत असल्याची चर्चा आहे.

मात्र, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांना विधानपरिषेवर संधी न मिळाल्याने ते ही विधानसभा लढविण्याच मनस्थितीत असल्याने इंदापूर विधानसभेचा तिढा कसा सुटणार की या ठिकाणी महायुतीत मिठाचा खडा पडणार हे पाहणे महत्त्वाचे आहे.

इंदापूर तालुक्यातील उपेक्षित घटकांचे प्रश्न शासन दरबारी थेट अधिवेशनात मांडून लोकसभेमध्ये झालेल्या पराभवाची मरगळ बाजूला सारण्याचा जरी प्रयत्न केला असला तरी नागरिकांना राष्ट्रवादीची थोडक्यात पवार कुटुंबात झालेली फोडाफोडी पटलेली नसून त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना लोकसभा निवडणुकीत साफ नाकरले आहे.

त्याचाच परिणाम विधानसभेवरही होणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली असली तरी लोकसभेपेक्षा विधानसभेचा आखाडा नक्कीच वेगळा असतो आणि विधासभेत अजित पवाराच दादा असल्याचे अतापर्यंत सिद्ध झाले आहे. दरम्यान, लोकसभेच्या अनुभवावरून कार्यकर्त्यांमध्ये चलबिचल सुरू असून निवडणूक जाहीर झाल्यानंतर काय उलथापालथ होणार यासाठी वेट अँड वॉचचीच भूमिका बजवावी लागणार आहे.

### हर्षवर्धन पाटलांच्या भूमिकेकडे लक्ष

» माजी मंत्री भाजप नेते हर्षवर्धन पाटील यांचे कार्यकर्ते यंदा विधानसभेला हर्षवर्धन पाटील यांना आमदारच करायचे, असे पक्क गणित मनात धरून बसले आहेत, त्यामुळे महायुतीच्या नेत्यांसमोर हा गुंता सोडविणे फार अवघड आहे, तरी हर्षवर्धन पाटलांना साखर संघाचे अध्यक्षपद देऊन त्यांची नाराजी थोडीफार दूर केल्याची चर्चा असली तरी हर्षवर्धन पाटील ऐन निवडणुकीच्या तोंडावर कोणता बॉम्ब फोडणार की पक्षादेश मानून महायुतीच्या उमेदवाराचे काम करणार हे पाहणे औत्सुक्याचे आहे.

### पवार गटातून कोण?

» जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रवीण माने यांनी सुरुवातीला पवारांच्या कार्यक्रमात हजेरी लावून आपण पवार गटात असल्याचे दाखवून दिले होते. तर लोकसभा निवडणुकीत थेट महायुतीचे उमेदवार सुनेत्रा पवार यांचे काम केल्याने त्यांच्याबाबत उलटसुलट चर्चा रंगली होती. तर लोकसभा निवडणुकीत पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आप्पासाहेब जगदाळे, कर्मयोगी शंकरराव पाटील सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांनी शरद पवार गटात सहभाग घेत सुप्रिया सुळे यांना लिड मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावल्याने पवार गटातून माने, जगदाळे, शहा की आणखी कोणता नवीन चेहरा समोर येणार हे आगामी काळात स्पष्ट होईलच.

# घरगुती बियाणांना शेतकऱ्याकडून पसंती

## विक्रेत्यांकडे बियाणे पडून : बियाणे दर गगनाला भिडल्याचा विक्रीवर परिणाम



**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर हा तालुका बागायती तालुका म्हणून नावावर रूपाला आला आहे; परंतु शेतकरीच अडचणीत, बियाणांचे दर वाढल्यामुळे खरिपासाठी यावेळी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात घरगुती बियाणांचा वापर केला आहे.

अनेक कंपन्यांनी बियाण्यांचे भाव वाढविलेले आहेत. त्यामुळेच प्रामुख्याने शेतकऱ्यांनी तूरीसह इतर घरगुती बियाणे पेरणे पसंत केले आहे.त्याचा परिणाम बियाणे विक्रीवर दिसून आला आहे. पेरणीचे दिवस अंतिम टप्प्यात असतांना देखील विक्रेत्यांकडे मोठ्या प्रमाणात बियाणे पडून आहेत.जर कंपन्यांनी हे बियाणे परत घेतले नाही तर विक्रेत्यांना मोठा तोटा सहन करावा लागणार आहे.

दरवर्षी बियाणे कंपन्या भाववाढ करतात.याचा अनुभव शेतकऱ्यांना नेहमीच आलेला आहे. यंदा मात्र काही कंपन्यांनी प्रती किलो बियाण्यांवर 100 रुपयांवर अधिक भाव वाढविलेले आहे. यामध्ये प्रामुख्याने तूर बियाण्यांचा समावेश आहे.

गेल्या वर्षी 280 रुपये प्रति किलो मिळणाऱ्या तूर बियाण्यांचे भाव यंदा मात्र 400 रुपये प्रति किलोवर गेले आहे. त्याच पाठोपाठ तिळ, उडीद, मूग, सोयाबीन बियाण्याचे भावही दिसून आलेत. परिणामी दरवर्षीचा अनुभव पाहता यावेळी मात्र सुरुवाती पासूनच घरगुती बियाणे वापरण्याचा निर्णय घेतला होता.

त्यामुळे सोयाबीन तयार होताच चांगले सोयाबीन पेरणीसाठी ठेवणे त्याच पद्धतीने तूर, उडीद, मूग हे सुध्दा शेतकऱ्यांनी आवश्यकतेनुसार पेरणीसाठी सांभाळून ठेवले होते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी बियाणे विकत आणले नाहीत.

### मक्याचे बियाणे खरेदीवर भर

» मका बियाणे मात्र खरेदी करताना शेतकरी दिसतो आहे. कारण पशुधन वाचवण्यासाठी मका चारा इंदापूर तालुक्यातील ग्रामीण भागात अत्यंत पोषक ठरलेला आहे. त्यामुळे आपली मका जोरदार आली पाहिजे यासाठी मक्याचे बियाणे शेतकरीराजा खरेदी करतो आहे; मात्र गगनाला भिडलेले दर शेतकऱ्यांना आर्थिकताण देणारी ठरत आहेत.

### घरगुती बियाणे घेतले उसनवारीने

» ज्या शेतकऱ्यांकडे घरगूती बियाणे नव्हते.अशा शेतकऱ्यांनी कंपनीऐवजी दुसऱ्यांकडून घरगूती बियाणे उसनवारीने घेतले आहे.त्यामुळे यंदा घरच्या बियाणावर शेती फुलवायची हा मानस शेतकऱ्यांनी धरलेला दिसतो आहे.